परवानगी वर्ष : २० ०५-२० ०६
माध्यम : मराठी
कायम विना अनुदान

जा.क्रं.माध्य-३/१४/प्रथम मान्यता/पुवि/२० ०६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक :- 07 SEP 2006

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे ........

विषय :- प्रथम मान्यता...
माध्यमिक विद्यालय, सांगिसे, ता-मावळ, जि-पुणे.

संदर्भ :- १. आपले पत्र क्रं. शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा/३७०/०६ दि. २६/८/०६

२. शा.प.क्रं. नमाशा-१००५/[३०८/०५] माशि-१ दि. २८/६/०५

३. कार्यालयाचे पत्र क्रं माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/पुवि/०६
दि. २/५/२००६.

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये कै. उषाताई लोखंडे चॅरीटेबल ट्रस्ट, स.नं. १०२/वैदुवाडी, पुणे-१६ .............. संस्थेच्या माध्यमिक विद्यालय, सांगिसे, ता-मावळ, जि-पुणे. .................... माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००५ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुना घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे १ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

मूळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे -१ करिता

प्रत - १. मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, सांगिसे, ता-मावळ, जि-पुणे.
..............................

२: निवड नस्ती

११६२८०/३८

जा.क्र. माध्य.३(१४)/नमाशा/मान्यता/पुवि/०६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :

- 6 JUN 2006

प्रति,

सचिव,
कै. उषाताई लोखंडे चॅरिटेबल ट्रस्ट,
स. न. १०२/ वैदुवाडी, पुणे १६

विषय : परवानगी देण्यात आलेल्या माध्यमिक शाळेत प्रत्यक्षात सुरु असलेल्या वर्गांना परवानगी देणेबाबत. . .

संदर्भ : १) शासन पत्र क्र. : नमाशा १००४/(४०७/२००४) माशि-१. दि. २१.७.०४
२) शासन पत्र क्र. : नमाशा १००५/(३०८/२००५) माशि-१. दि. २८.६.०५
३) शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद, पुणे यांचे पत्र क्रं जिप/शिक्षण/माध्य /ह-४/१२२/०६ दिनांक ९/५/२००६

उपरोक्त विषयाचे संदर्भात आपणास कळविण्यात येते की, शासन पत्र क्रमांक नमाशा १००५/(३०८/२००५) माशि-१ दिनांक २८/६/२००५ अन्वये आपल्या या संस्थेच्या **मराठी** माध्यमाच्या माध्यमिक शाळेस इयत्ता आठवीच्या वर्गास **सांगिसे, मावळ** येथे सन २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विना अनुदान** तत्वावर परवानगी देण्यात आली त्यास अनुसरुन या कार्यालयाचे पत्र क्रमांक माध्य-३/(१४)/नमाशा/मान्यता/पुवि/९१८४/८८/२००६ दिनांक २/५/२००६ अन्वये नवीन माध्यमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर **जुन २००५** पासून सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

आपल्या संस्थेच्या शाळेत इयत्ता ८ वी बरोबरच ९ वी चा वर्ग सुरु असल्याने संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेवून संदर्भीय क्रं. १ च्या शासन पत्रान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन शिक्षाणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, **पुणे** यांची शिफारस विचारात घेता इयत्ता ८ वी बरोबरच इयत्ता ९ वी च्या वर्गास विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून **सन २००५ - २००६** सुरु करण्यास **कायम विना अनुदान** तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

मूळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रतिलिपी -
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता अग्रेषित

प्रत - माहितीस्तव सविनय सादर
२. मा. अवर सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय
विस्तार भवन, मुंबई ३२
३. मा. शिक्षण संचालक, ( माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १
४. निवडनस्ती

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ई-8/ १९४
नै.वाढ/05-06
पुणे. दिनांक : १५/६/2006.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
माध्यमिक विद्यालय, सांगिसे,
ता. मावळ, जि. पुणे.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. 2006-07.
===== ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी.

आपल्या कै. उषाताई निरवंडे चॅरिटेबल ट्रस्ट : या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित माध्यमिक विद्यालय, सांगिसे ता. मावळ. माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/इ.९ वी.चा वर्ग सुरु करणेस सन 2005-06 या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/११६२७/30, दि. ६।६।2006. अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन 2006-2007 या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून 2006 पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे ~~५०~~ यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे करिता.